सकाळ | eSakal.com
Published on सकाळ (http://www.esakal.com)

# वाचनविश्‍वाला आधुनिक "टच'

- - सकाळ वृत्तसेवा
बुधवार, 23 एप्रिल 2014 - 01:00 AM IST

पुणे - कागदावर छापलेल्या शब्दांनी अनेक दशकांपासून वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजविले आहे. मात्र आता ई-बुक आणि ऑडिओ बुकच्या साह्याने वाचन संस्कृतीत आधुनिकतेची भर पडली आहे. ललित साहित्याबरोबरच शिक्षण, संदर्भ ग्रंथ, विज्ञान विषयातील अनेक पुस्तकांची पाने टॅब किंवा मोबाईलवर एका "टच'ने उलटत आहेत, तर काही पुस्तकांमधील शब्द न्‌ शब्द ऑडिओ स्वरूपात हृदयाला भिडत असल्याने नवी पिढी वाचनविश्‍वात रममाण होत आहे.

अगदी दोन ते तीन वर्षांपूर्वी अनोळखी वाटणारी ई-बुक संकल्पना आता घराघरात पोचली आहे. आधुनिक युगात मोबाईल, टॅब्लेट, आयपॅडच्या स्वरूपात अवघे विश्‍व हातात एकवटण्याचा प्रयत्न होत आहे. यात पुस्तकवेडे वाचक मागे राहतील, तर नवलच. वाचन संस्कृती कमी होत नसून, तिला वेगळी कलाटणी मिळाल्याचे मत बुकगंगा डॉट कॉमचे बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर विवेक चितळे यांनी व्यक्त केले. "बुकगंगा'तर्फे आतापर्यंत मराठीतील जवळपास 10 हजार पुस्तके ई-बुकच्या स्वरूपात उपलब्ध करून दिली आहेत. ते म्हणाले, ""कथा, कादंबरी, आत्मचरित्र अशा ललित साहित्याबरोबरच शिक्षण, संदर्भ ग्रंथ, विज्ञान, धार्मिक अशा ई-बुकला अधिक पसंती दिली जाते. सहा महिन्यांत संकेतस्थळावरून हजारो पुस्तके डाऊनलोड करण्यात आली आहेत, तर काही ग्रंथालयांतर्फे दुर्मिळ पुस्तकांचे ई-बुकमध्ये रूपांतर करण्याची मागणी होत आहे.''

© eSakal.com, all rights reserved